**औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस**

| पोलीस अधिक्षक, कार्यालय | **प्रेसनोट** | दिनांक १३/०९/२०१७ |
|---|---|---|

**प्रति,**
**सर्व सन्माननीय,**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी यांचे मुलींनी १० वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या बद्दल मा. डॉ.आरती सिंह पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी पोलीस कर्मचारी यांचे गुणवंत पाल्यांचा उत्तेजनार्थ सत्कार कार्यक्रम पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पार पाडला.

कार्यक्रमात पोलीस कर्मचा-यांच्या गुणवंत पाल्यामध्ये कु. अश्विनी बी. भताने ९४.८० टक्के गुण घेवुन सध्या ११ वी विज्ञान शाखेत शासकिय ज्ञान विज्ञान महाविदयालय, औरंगाबाद येथे शिक्षण घेत असुन तिने भविष्यात डॉक्टर बनण्याची ईच्छा व्यक्त केली. त्याच प्रमाणे कु. अदिती कैलाश कामठे हिने ९३.४० टक्के गुण मिळवुन ती सध्या ११ वी विज्ञान शाखेत वंसतराव नाईक महाविदयालय, औरंगाबाद येथे शिक्षण घेत असुन आय.आय.टी. प्रवेशाची तयारी करत असले बाबत नमुद केले. तसेच सुहाना राजु शेख हिने ९२.६० टक्के मिळवुन ११ वी कॉमर्स शाखेत प्रतिष्ठान कॉलेज,पैठण येथे शिक्षण घेत असुन भविष्यात प्रशासकिय अधिकारी होण्यासाठी प्रयत्न करणार असले बाबत मत तिने मांडले.

मा. पोलीस अधीक्षक यांनी सर्व गुणवंत मुलींचे अभिनंदन करून त्यांना बक्षिस देवुन त्यांचा गौरव केला व उज्वल भविष्या करिता त्यांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे गुणवंत मुलांसाठी प्रत्येक वर्षी पोलीस अधीक्षक यांचे मार्फतीने पोलीस कल्याण निधीमधुन त्यांना शिक्षणासाठी अनुदान देवुन मदत करण्यात येते.

**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करिता**

Scanned by CamScanner